**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

तक्रार क्र. ७६/२०१९

**तक्रारकर्ता श्री.कैलाश आत्माराम बनसोड.**
**रा.अशोक नगर, मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम.**
**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी कार्यालय,**
**पंचायत समिती, कार्यालय, मालेगांव, ता.मालेगांव जि.वाशिम.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम**
**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.२५.११.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी मग्रारोहयो माहिती अवलोकनार्थ न देणे, जन माहिती अधिकारी श्री.सोंडकर यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास कसूर व हेकसांड करणे, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.बाळकृष्ण अवहळ व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जि.आर.इंगोले हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी जोडपत्र-अ व ब दाखल न करता आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.बनसोड यांनी दाखल केलेल्या दि.२५.११.२०१९ रोजीच्या कलम १८ (१) च्या तक्रार अर्जानूसार गट विकास अधिकारी पंचायत समिती, मालेगांव यांना महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची माहिती अवलोकनार्थ न देणे, जन माहिती अधिकारी यांनी

माहिती न देणे त्यामुळे त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याची मागणी तक्रारकर्ता यांनी केलेली आहे. आयोगाचे वतीने तक्रारकर्ता यांना, अर्ज सादर केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने विहीत वेळेत प्रतिसाद दिला नाही, चुकीची माहिती दिली, दिशाभूल करणारी/असमाधानकारक/अपूर्ण माहिती दिल्यास अधिनियमाचे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल करण्याची तरतुद आहे. प्रथम अपिलीय अधिकरी यांनी प्राप्त प्रथम अपील अर्जावर ४५ दिवसात सुनावणी घेवून ओदश निर्गमित करणे अपेक्षीत आहे. त्यांनी सुनावणी न घेतल्यास/आदेश निर्गमित न केल्यास किंवा त्यांचा निर्णय मान्य नसल्यास अधिनियमाचे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा, असे सूचित करण्यात आले होते. तसेच अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांना विहीत मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याचा आक्षेप नोंदवित तक्रार अर्ज दाखल केले असल्याबाबत कार्यवाही करण्याचे व खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. उपरोक्त प्रकरणी तक्रारकर्ता यांचे तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता, यात विचारलेली माहिती ही महात्मा गांधी रोजगार हमी योजनेशी संबंधीत असून, मनरेगा आयुक्तालय यांनी या आधिच याबाबतीत सर्व माहिती ही त्यांच्या अधिकृत संकेतस्थळरावर विनामुल्य अवलोकनार्थ प्राप्त करुन घेण्याकरिता उपलब्ध करुन दिलेली आहे. तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मनरेगा अंतर्गत कामाच्या रेकॉर्ड अवलोकनार्थ देण्याबाबत केलेली विनंती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव तक्रारकर्ता यांना अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावी. तक्रारकर्ता श्री.बनसोड यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क व समन्वय साधून आज पासून २ आठवड्याच्या आत कार्यालयीन काम काजाच्या दिवशी, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत, कार्यालयीन कामात हस्ताक्षेप होणार नाही याची खातरजमा बाळगून तसेच मुळ दस्तऐवजाला हानी पोहोचणार नाही याची काळजी घेत नस्तीचे अवलोकन करुन त्यांना अपेक्षीत असणारी व कलम २ (च) प्रमाणे वरील नस्तीमध्ये उपलब्ध असणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच वरील माहिती सॉफ्ट कॉपी स्वरुपात उपलब्ध असल्यास तक्रारकर्ता यांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठविण्याच्या निर्देशासह वरील तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०७.२०२४**

जावक क्रमांक ८२८८ दिनांक 30 OCT 2024

30 OCT 2024

Vishal D.Ingale-२०२४/